क्र. पोमसं/२-अ/विधी अधिकारी-नांदेड/४२/२०२०
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहिद भगतसिंह मार्ग, जुने विधान भवन
मुंबई, दिनांक - २२ /०६/२०२०

**विषय** :- विधी अधिकारी (वर्ग-ब) व विधी अधिकारी यांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी जाहिरात व अर्जाचा नमुना संकेत स्थळावर प्रसारित करण्याबाबत.

*****

उपरोक्त विषयावरिल विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र यांचे पत्र क्र.आस्था-१/वि.अ. नियुक्ती/जाहिरात/प्रसिध्दी/२०२०/१९५३, दि.०३/०६/२०२० ची प्रत सहपत्रांसह सोबत जोडली आहे.

पोलीस उप अधीक्षक यांनी जाहिरात व अर्जाचा नमुना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर कृपया प्रसारित करावा. सदर जाहिरात दि.३०/०६/२०२० पर्यत संकेतस्थळावर ठेवण्यात यावी.

( राजेश प्रधान)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय.

प्रत,

विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड

WPN megha | shenter
for uploading
22/6/2020

(1)

# विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड.

दुरध्वनी क्रं. - ०२४६२-२५१३१६ नियंत्रण कक्ष क्रं. ०२४६२-२५१२५३
फॅक्स क्रं. -०२४६२-२५१४५१ ई-मेल - ig.nandedrange@mahapolice.gov.in

शाखा – आस्थापना शाखा-१

जावक क्र.आस्था-१/वि.अ नियुक्ती/जाहिरात/प्रसिध्दी/२०२०/ 1953

दिनांक /०६/२०२० 03 JUN 2020

प्रति,

पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई

विषय:— विधी अधिकारी (वर्ग—ब) व विधी अधिकारी यांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत

———

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती करण्यात येते की, विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे अधिनस्त असलेल्या पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड परभणी, लातूर, हिंगोली यांच्या आस्थापनेवर विधी अधिकारी (गट—ब) व विधी अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात पदे भरण्याकरीता सोबत जोडलेली जाहिरात कृपया **mahapolice** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

03-6-2020

( मनोज लोहिया )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड

सोबत :— जाहिरात प्रगटन व आवेदन पत्र पान १ ते ८

# जाहिरात

## विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड परिक्षेत्राच्या अधिनस्त असलेल्या पोलीस अधीक्षक, नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली यांच्या आस्थापनेवरील विधी अधिकारी गट—ब व विधी अधिकारी यांचे रिक्त पदे पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी जाहिरात

क्रमांक आस्था—१/वि.अ./भरती/२०२० नांदेड दि. /६/२०२०

पोलीस अधिक्षक कार्यालयातील विधी अधिकारी (वर्ग—ब) व
उप विभागीय कार्यालयातील विधी अधिकारी यांची पदे ११ महिने कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिनस्त कार्यालयाकरीता दि.२१.०८.२००६ च्या शासन निर्णयान्वये विधी अधिकाऱ्याच्या निर्माण केलेल्या पदांपैकी विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या निवडमंडळ (समिती) द्वारे खालील नमूद विधी अधिकरी (वर्ग—ब) व विधी अधिकारी यांचे पदे करार तत्वावर/कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात (फक्त ११ महिन्यासाठी) भरावयाची आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे :—

| अ.क्र. | पदनाम | विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्य अधिनस्त असलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकरीता भरावयाची एकूण पदे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नांदेड | परभणी | लातूर | हिंगोली | एकूण |
| १ | विधी अधिकारी (वर्ग—ब) | १ | १ | १ | १ | ४ |
| २ | विधी अधिकारी | १० | ६ | ७ | ३ | २६ |

सुचना:— याबाबतचे अर्ज विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचेकडे दि.३०.०६.२०२० पूर्वी सादर करावेत.

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालून उजव्या बाजूला ठळक बाजूला विधी अधिकारी वर्ग—व/विधी अधिकारी च्या पदासाठी अर्ज असे नमुद करून दि.३०.०६.२०२० पर्यत विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड कार्यालय, वसवेश्वर चौक, ट्रेझर बाजार (मॉल) समोर, नविन कौठा, नांदेड ४३१६०३ या पत्त्यावर पोहचेल याची दक्षता घ्यावी. दि.३०.०६.२०२० नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे आवश्यक त्या मुल्याचे पोस्टल तिकीट लावून जोडावेत.

टिप:— १) सदरची जाहीरात www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर अर्जाचा नमुना डाउनलोड करून अर्ज परिपुर्णरित्या भरावा.

२) परिक्षा शुल्क रू.५०० (अक्षरी पाचशे रूपये फक्त)ठरविण्यात आले असून, सदर परिक्षा शुल्क केवळ

Demand Draft स्विकारण्यात येतील. त्यामुळे अर्जासोबत **"P.A. to Spl. I.G. Nanded Range, Nanded"** यांचे नावे असलेल्या राष्ट्रीयकृत बॅंकेचा Demand Draft अर्जासोबत जोडावा. अर्जासोबत Demand Draft नसलेले अर्ज बाद ठरवीण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) महाराष्ट्र शासन गृह विभाग निर्णय कमांक एसपीपी–२००५/प्रक्र.२४७/पोल–१०, दि.१५.०९.२००६ अन्वये उक्त पदे दिनांक २१.०८.२००६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियीमत वेतन श्रेणीत न भरता एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने भरण्यास खालील अटीच्या अधीन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे. वर दिलेल्या पदसंख्येत/नियुक्तीच्या ठिकाणात बदल होण्याची शक्यता असू शकते. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील.

करारातील मासीक देय रक्कम:–

अ) विधी अधिकारी (वर्ग–ब) या पदाकरीता करारातील मासीक देय रक्कम रूपये २५०००/– + दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रू ३०००/– असे एकूण रू २८०००/– दरमहा देय राहील.(उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

ब) विधी अधिकारी या पदाकरीता करारातील मासीक देय रक्कम रू २००००/– + दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रू ३०००/– असे एकूण रू २३०००/– दरमहा देय राहील. (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा :–

१) शैक्षणिक अर्हता:–

१.उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर व सनदधारक असेल

२) वयोमर्यादा :–

१. विधी अधिकारी (गट–ब) या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.

२. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६० वर्षा पेक्षा जास्त नसेल.

३) जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायदेविषयक सखोल ज्ञान असेल त्या प्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तिची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

४) अनुभव :—

१. विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी या दोन्ही पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहिल.

२. उमेदवारास गुन्हेगारी वि  ायक, सेवाविषयक, प्रशासनीक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञानसपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

३. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

४. संगणकाचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**५) विधी अधिकारी (गट—ब) आणि विधी अधिकारी यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या :—**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकश्या तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती या बाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधीत अधिकाऱ्याच्या मदतीने तयार करणे

४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पहाणे.

५. अपील जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाचा निर्णयाचा अभ्यास करून तद्नुषंगाने दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करणे तो संबंधीत सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे

७. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशन मध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९. कायदा, सेवा व प्रशासनासंबंधी इतर अनुषंगीक कामे.

६) अटी व शर्ती :—

१. मा.सर्वोच्च न्यायालया समक्ष न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेष हक्क याचिका (CIVIL) क्र. CC 19088-19009/2012, महाराष्ट्र आणि इतर विरूध्द अनिता आणि इतर तसेच (CIVIL) क्र. CC 20182/2012, नारायण तुकाराम पंत जोशी आणि इतर महाराष्ट्र शासन आणि इतर मधील अंतीम निर्णयाच्या अधीन सदरील कंत्राटी पध्दतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

२. सदर पदांची नेमणुक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल या अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाही.

३. सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यासाठी करण्यात येतील ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त तीन वेळा, ११ महिन्यांकरीता) वाढविता येईल. तीन वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवारांची पुनश्च: नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, समक्ष प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च: निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

४. निवड केलेला उमेदवार ११महिन्याच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या लेखी परवानगी शिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

५. उमेदवाराची निवड लेखी परीक्षेद्वारे तसेच मुलाखतीद्वारे करण्यात येईल. परीक्षेचा तसेच मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.

६. उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च दिला जाणार नाही.

७. नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (AGREEMENT) भरणे अनिवार्य राहील.

८. करार पध्दतीने नेमणुक करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना एकत्रीत वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चा व्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.

९. उमेदवाराने वर विहीत केलेल्या अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी जाहिरातीचे दिनांकापर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

१०. अर्जासोबत २.५ से.मी x २.५ से.मी आकाराचे सद्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

७) उमेदवारांस आवश्यक त्या सुचना :—

१. वरील सर्व नमूद अटी अर्हता व अनुभव असणारे तसेच आवश्यक त्या सर्व कागदपत्राची करणारे उमेदवार सदर पदांसाठी पात्र राहतील.

२. वरील पदांच्या भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

३. वरील पदांच्या भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची शिफारस किंवा गैरप्रकाराचा अवलंब करण्यात येऊ नये असा प्रकार निदर्शनास आल्यास ते उमेदवार निवडीस अपात्र ठरविण्यात येतील.

( मनोज लोहिया )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड

# अर्जाचा नमूना

विधी अधिकारी गट–ब /विधी अधिकारी पदाकरिता अर्ज

नियुक्तीचे इच्छूक ठिकाण :–. ______________

एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाफयात जोडावा

कार्यालयीन उपयोगासाठी

१. अर्ज क्रमांक : ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐

२. अर्ज स्विकारल्याचा दिनांक : ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐

३. अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह) :. ______________

---

सूचना : अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

ज्या पदासाठी व जिल्हयासाठी अर्ज केला आहे तेथे (√ ) अशी खूण करावी.

| जिल्हा | नांदेड | परभणी | लातुर | हिंगोली |
|---|---|---|---|---|
| विधी अधिकारी (वर्ग–ब) | | | | |
| विधी अधिकारी | | | | |

## अर्जदाराची वैयक्तीक माहिती :

१ अर्जदाराचे संपूर्ण नांव : आडनांव नाव वडीलांचे / पतीचे नाव
मराठीत : . ______________

# इंग्रजीत : ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐

२ पत्रव्यवहाराचा पत्ता :. ______________

तालुका ______. जिल्हा ______. पीनकोड ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐

३ कायमचा पत्ता :. ______________

तालुका ______. जिल्हा ______. पीनकोड ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐

४ दूरध्वनी क्रमांक – लॅन्डलाईन . ______________. मोबाईल क्रमांक . ______________.

४ A ई–मेल: . ______________.

५. जन्मदिनांक : ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ जन्म स्थळ :________________.

दिवस महिना वर्ष

६. दिनांक / / रोजीचे वय : ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐

७ लिंग : पुरूष ☐ / महिला ☐

८ धर्म : ________________. जात :________________.

९ महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? : होय ☐ / नाही ☐

☼ योग्य असेल त्या ठिकाणी (√ ) अशी खूण करावी.

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती :

१० शैक्षणिक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव विद्यालय/महाविद्यालय | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दि. | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी.) अथवा जूनी ११ वी परिक्षा | | | | | |
| २ उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१२वी.) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |

११. इतर शैक्षणिक अर्हता :
संगणक प्रशिक्षीत आहे काय : ? : होय ☐ / नाही ☐

१२ अर्जदाराची इतर माहिती.
अ) सनद घेतल्याचा दिनांक
ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशील :

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

टिप : वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१३) अ) अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात / बध्द करण्यात/ दंड करण्यात/सिध्ददोषी ठरविण्यात आले आहे काय? किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परिक्षांना / निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय? किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय? किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय?/ काढून टाकण्यात आले काय?

होय ☐

नाही ☐

ब) हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय?

होय ☐

नाही ☐

(१३ अ किंवा १३ ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्द, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.)

०००००

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री./सौ./कु. ______________________________ यांव्दारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो/ करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकिची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.